# नामदार गोखलेंच्या घरात 'संग्रहालय'

Suneet.Bhave
@timesgroup.com

**पुणे :** महात्मा गांधी यांचे राजकीय गुरू आणि थोर समाजसेवक गोपाळ कृष्ण गोखले यांच्या घराचे जतन महापालिकेतर्फे करण्यात येणार असून, या वास्तूत संग्रहालय उभारण्याचे नियोजन आहे. या माध्यमातून खासगी वास्तूच्या जतन-संवर्धनासाठी महापालिकेने प्रथमच पुढाकार घेतला आहे. येत्या ऑगस्टपर्यंत पहिला टप्पा पूर्ण करण्यात येणार आहे.

गोपाळ कृष्ण गोखले यांचे राहते घर गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या आवारात आहे. गोखले यांना भेटायला येणाऱ्या महात्मा गांधी, महंमद अली जिना, मदनमोहन मालवीय यांच्या खोल्या; तसेच गोखले यांच्यातर्फे वापरण्यात येणाऱ्या विविध वस्तू आणि त्यांना मिळालेले मान-सन्मान कायमस्वरूपी प्रदर्शित करण्यासाठी संग्रहालय करण्याचा पालिकेचा प्रयत्न आहे. गोखले स्मारक ही ग्रेड-१ अंतर्गत येणारी ऐतिहासिक वास्तू आहे. परंतु, गोखले यांचे घर खासगी संस्थेच्या आवारात असल्याने 'ग्रेड-१ दर्जा असूनही 'तेथे सुधारणा करण्यास पालिकेवर मर्यादा येत होत्या. गोखले यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून नवीन पिढीपर्यंत त्यांचे कार्य पोहोचावे, यासाठी पालिकेने पुढाकार घेण्याचे निश्चित केले.

काँग्रेसचे शहराध्यक्ष अभय छाजेड यांनी त्यासाठी पाठपुरावा केला. शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीत (डीसी रूल्स) अनुशंगिक बदल केले गेले. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेनेही त्याला मंजुरी दिली. त्यामुळे, गोखले यांच्या निवासस्थानापासून ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या खासगी वास्तूचे जतन-संवर्धन करणे पालिकेला शक्य होणार आहे. गोखले यांच्या निवासस्थानाची दुरुस्ती पहिल्या टप्प्यात हाती घेण्यात आली आहे. त्यामध्ये, नादुरुस्त लाकडी स्ट्रक्चरल मेंबर्स बदलणे, छताचे वॉटरप्रुफिंग करणे, नादुरुस्त छत आणि व्हरांडा यांची पुनर्बांधणी करणे, दगड, लाकूड कामावरील ऑइलपेंट काढणे, जुनी कौले साफ करून पुन्हा बसविणे, नवीन डेकोरेटिव्ह खांबांची उभारणी करणे आणि लँडस्केपिंग अशी विविध स्वरूपाची कामे केली जाणार आहेत. येत्या ऑगस्टअखेरपर्यंत पहिल्या टप्प्यातील कामे पूर्ण होतील. त्यासाठी, २५ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे, अशी माहिती हेरिटेज सेलचे प्रमुख श्याम ढवळे यांनी दिली.

राहल देशमुख



## गोखलेंचे जीवनकार्य मांडणार

गोपाळकृष्ण गोखले यांना मिळालेले मान-सन्मान, त्यांचे जीवनकार्य यावर आधारित संग्रहालयाची निर्मिती करण्याचाही पालिकेचा मानस आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर पुणे दर्शन आणि शाळा-महाविद्यालयांच्या सहलीसाठी संग्रहालय खुले करण्यात येणार आहे.

**ऐतिहासिक महत्त्व असलेल्या केंद्र-राज्य आणि महापालिकेच्या मालकीच्या इमारतींमध्ये जतन-संवर्धनाचे काम आजवर करता येत होते. गोखले यांचे जीवनचरित्र आणि त्यांचे कर्तृत्व लक्षात घेऊन त्यांच्या निवासस्थानाचे काम पालिकेने करावे, अशी इच्छा होती. त्यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त हे काम सुरू झाले, याचे समाधान आहे.**

**- अभय छाजेड,** शहराध्यक्ष, काँग्रेस

**मटा विशेष**